D.A.V. PUBLIC SCHOOL, THANE
SESSION :2022-2023
FINAL EXAMINATION
SUBJECT -MARATHI

STD:VIII **Max Marks:80**
Date: 2/03/2023 **Time- 3HOURS.**

सूचना - सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक .

विभाग = 10 गुण वाचन विभाग

विभाग = 20 गुण लेखन विभाग

विभाग = 15 गुण व्याकरण विभाग

विभाग = 35 गुण पाठावरील प्रश्न विभाग

<u>विभाग -अ</u>

प्रश्न 1. खालील गद्य उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (5)

इसवी सन १८१७ मध्ये घडलेला हा प्रसंग आहे. पुण्याचा कारभार तेव्हा पेशव्यांच्या स्वाधीन होता. संपूर्ण देशावर इंग्रजांचे राज्य होते. इंग्रजांचे ध्येय होते पुणे जिंकायचे शनिवार वाड्यावरचा भगवा ध्वज काढायचा. तेथे युनियन जॅक फडकवायचा. इंग्रज सेना सर्व तयारीनिशी पुणे शहर जिंकण्यासाठी सावधपणे चाल करून येत होती. खडकी येथे पेशवे आणि इंग्रजांच्या तुंबळ युद्ध झाले. अनेक वीर युद्धात धारातीर्थी पडली पेशव्यांचा पराजय झाला .१७ नोव्हेंबर १८१७ या दिवशी पुणे इंग्रजांच्या ताब्यात गेले.

खडकीच्या या लढाईत राघू राऊत साळवे यांचा इंग्रजांनी बळी घेतला. त्यांचे शरीर मिळणार होते. लाठीकाठी तलवार दांडपट्टा व बोथाटी फिरवण्यात ते तरबेज होते घोड्यावर मांड ठोकण्यात वाकबगार होते. त्यांनी एकदा जिवंत वाघास खांद्यावर घेऊन पेशवे दरबारी आणले होते. खडकीच्या लढाईत राघोजी लढता लढता हुतात्मा झाले. त्यांचा 22 -23 वर्षांचा शूर धाडसी मुलगा लहुजी त्यांच्या जवळच होता.वडील लढता लढता प्राणास मुकले . हे लहुजीनी उघड्या डोळ्यांनी पाहिले होते .यामुळे वडिलांच्या निधनामुळे इंग्रजी सत्ते विरुद्ध त्यांच्या मनात रागाची आग भडकली.

प्रश्न 1 इंग्रजांचे कोणते ध्येय होते ?

2 पुणे इंग्रजांच्या ताब्यात केव्हा गेले ?

3 खडकीच्या लढाईत इंग्रजांनी कोणाचा बळी घेतला ?

4 राघू साळवे कशात तरबेज होते ?

5 लहूजीनी उघड्या डोळ्यांनी काय पाहिले ?

प्रश्न 2.खालील गद्य उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (5)

१९५२ नंतर 'लोकप्रतिनिधी' म्हणून बाळासाहेब देसाई यांचे कार्यक्षेत्र विस्तारले ते विधानसभेवर निवडून गेले. त्यानी महाराष्ट्र सरकारमध्ये वेगवेगळी मंत्रिपदी भूषवली . बांधकाम मंत्री असताना त्यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासाला पायाभूत ठरतील अशा योजना मोठ्या प्रमाणात राबवल्या . कोयना धरण

व वीज प्रकल्प यांच्या उभारणीसाठी त्यांनी जगजागृती केली. परिषदा भरवल्या धरणासाठी जमीन संपादन करण्यापासून ते प्रत्यक्ष धरणाच्या बांधकामाच्या वेगवेगळ्या टप्प्यातील कामापर्यंत त्यांनी सर्वच कार्यांना चालना दिली . या प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील मोठ्या शहरातील उद्योग धंद्यांना वीज म्हणून लाखो लोकांना रोजगार मिळाला. खेड्यापाड्यांना व वाड्या वस्त्यांना वीज मिळून अनेकांचे जीवन उजळून निघाले. हा प्रकल्प बाळासाहेबांच्या जिद्दीमुळे चिकाटीमुळे वेगवान झंजावाती कारकिर्दीमुळे पूर्ण झाला.

प्रश्न 1 लोकप्रतिनिधी म्हणून बाळासाहेबांचे कार्यक्षेत्र केव्हा विस्तारले ?

प्रश्न 2 कोयना व वीज प्रकल्प यांच्या उभारणीसाठी जनजागृती कोणी केली ?

प्रश्न 3 लाखो लोकांना रोजगार कशामुळे मिळाला ?

प्रश्न 4 अनेक लोकांचे जीवन कशामुळे उजळून निघाले ?

प्रश्न 5 बाळासाहेबांनी कोणते पद भूषविले ?

विभाग -ब

प्रश्न3.खालील पैकी कोणत्याही एका विषयावर 70 ते 80 शब्दात निबंध लिहा. (8)

1. मी पंतप्रधान झालो तर ----- 2. मी पाहिलेले पर्यटन स्थळ ------ 3. फळ्याचे आत्मवृत्त

प्रश्न4. मुद्द्याच्या आधारे कथा लेखन करा तिला शीर्षक देऊन तिचे तात्पर्य लिहा. (5)

मुद्दे : एक वृद्ध शेतकरी -------- शेतात आंब्याची रोपे लावणे --------- तेथून राजाचे आगमन ---- आश्चर्य --------- " या झाडांची फळे तुला कशी खायला मिळणार ?"राजाचा प्रश्न --------'मी ज्या झाडाचे आंबे खातो आहे ती मी लावलेली नाहीत '---------शेतकऱ्याचे उत्तर --------- राजाला आनंद ---------- मोहरांची थैली बक्षीस ---------तात्पर्य .

किंवा

मुद्दे : राजाची दवंडी-------सूर्योदयापासून चालायला सुरुवात करावी---------- सूर्यास्तापर्यंत मूळ जागी यायचे---------- चालून होईल तेवढी जमीन चालणार याला बक्षीस.----------एक सावकार---------- -- चालायला सुरुवात --------परतण्याचे भान नाही------ सूर्यास्ताच्या वेळी जाणीव —-----अति श्रमाने मृत्यू---------- तात्पर्य.

प्रश्न 5. खालील पैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. (7)

परगावी (बाहेर गावी) गेलेल्या तुमच्या बाबांची प्रकृतीची चौकशी करणारे पत्र लिहा. (पत्राखाली लिफाफा आवश्यक)

किंवा

तुमच्या शाळेत प्रजासत्ताक दिन कसा साजरा केला याचे वर्णन करणारे पत्र मित्राला लिहा. (पत्राखाली लिफाफा आवश्यक)

विभाग -क

प्रश्न 6. अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा . (4)

1. ताई लगबगीने निघून गेली .
2. शनिवारवाडा खूप मोठा आहे .
3. रस्त्यावर गर्दी आहे .
4. वाह! काय सुंदर देखावा आहे .

प्रश्न 7. वाक्यांचे काळ ओळखा (3)

1. उद्या परीक्षा होईल .
2. रमेश जेवण करतो .
3. आई गावाला जाऊन आली .

प्रश्न 8. समानार्थी शब्द लिहा. (4)

1. कथा - 2. सखा - 3. आकाश - 4. आस -
5. घर- 6. नभ 7. उदर- 8. पाणी -

प्रश्न 9. विरुद्धार्थी शब्द लिहा. (2)

1. सावध x 2. हजर x 3. जिवंत x 4. आगमन

प्रश्न 10. शब्दांचे वचन बदला. (कोणतेही 2) (1)

1 महिना - 2. होडी - 3. ढाली - 4. सबबी -

प्रश्न 11. शब्दांचे लिंग बदला. (कोणतेही 2) (1)

1. आई - 2. पणजोबा - 3. मित्र - 4. सखा -

विभाग -ड

प्रश्न 12. खालील प्रश्नाची थोडक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही 3) (12)

1. पोटोबाबद्दलची तक्रार सांगून सर्व इंद्रियांनी ती तक्रार करण्याची कारणे सांगा .
2. लेखिकेने अनुभवलेली इस्पितळातील प्राण्यांची दुनिया तुमच्या शब्दात लिहा.
3. जिगरबाज भटके शब्दसमूहाचा अर्थ स्पष्ट करा .
4. शब्दकोशाचा तुम्हाला कळलेला अर्थ तुमच्या शब्दात लिहा .
5. आपण सगळे शरीररूपी राज्याचे सेवक आहोत' या विधानाबाबत तुमचे मत लिहा .

प्रश्न 13 खालील प्रश्नाची थोडक्यात उत्तरे लिहा . (कोणताही 1) (4)

1. आजि सोनियाचा दिवस | दृष्टी देखिले संतांस || रसग्रहण करा .
2. झुळकेची परोपकारी वृत्ती तुमच्या शब्दात लिहा .
3. इमान आम्हा एकच ठावे घाम गाळुनी काम करावे भावार्थ लिहा .

प्रश्न 14. एका वाक्यात प्रश्नाची उत्तरे लिहा. (कोणतेही-5) (5)

1 घोड्याचा शेणाला काय म्हणतात ?

2 लेखकाला कोणता पुरस्कार मिळाला ?

3 सगळ्यांनी कोणाचा जयजयकार केला

4 लोक का रडत होते ?

5 लेखिकेने उत्सुकतेने कोठे पाऊल टाकले ?

6 .ईशान का खुश झाला ?

प्रश्न 15. खालील कविता वाचून प्रश्न-उत्तरे लिहा . (5)

आभाळाची अम्ही लेकरे ,काळी माती आई
जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही ||
श्रमगंगेच्या तीरावरती
कष्टक-यांची अमुची वसती
नाव वेगळे नाही आम्हा गाव वेगळा नाही ||
इमान आम्हा एकच ठावे
घाम गाळुनी काम करावे
मार्ग वेगळा नाही आम्हा स्वर्ग वेगळा नाही ||

प्रश्न १) आभाळाची लेकरे कोणाला म्हटले आहे ?

प्रश्न २) काळ्या मातीला कोणती उपमा दिली ?

प्रश्न ३) श्रमगंगेच्या तीरावर कोणाची वस्ती आहे ?

प्रश्न ४) कष्टक-यांना काय ठावे आहे ?

प्रश्न ५)घाम गाळुनी काय करावे ?

प्रश्न 16. खालील रिकाम्या जागा भरा. (5)

1. माझं खेड अतिशय निसर्गरम्य आणि ---------- होत .

2. चिडलेल्या वाघिणीसारखी ----------पिंजऱ्यात फेऱ्या मारीत होती .

3 हे ज्ञानाचे तेज पसरले नव्या युगाच्या ----------

4 तो झाडाच्या ---------- घोडा बांधून ठेवायचा .

5 खेळ खेल्यामुळे आपल्या आयुष्यात ---------- येते .

प्रश्न 17 पाऊस पडत असताना एक छोटे पिल्लू दाराशी येऊ बसले आहे ,अशावेळी तुम्ही काय कराल ते लिहा . ? (4)